म.टा. ५-५-१.

# घोडबंदर रस्त्याचे रुंदीकरण होणार


**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

घोडबंदर रस्ता विकास आराखड्यात ६० मीटर रुंद दर्शवण्याची कार्यवाही मिरा-भाईंदर महापालिका त्यांच्या स्तरावर करणार आहे. नव्या विकास आराखड्यात हा रास्त रुंद दर्शवण्यासाठी राज्य सरकारला मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे होणारा विलंब टाळण्यासाठी आता हा निर्णय घेण्यात आला आहे. आराखड्यात रस्त्याचा समावेश झाल्यानंतरच रस्ता रुंदीकरणासाठी जमीन हस्तांतरण प्रक्रिया महापालिका राबवता येणार असल्याने ही प्रक्रिया राबवली जात आहे.

ठाणे-घोडबंदर रोडवर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त आहेत. यामागे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनांच्या संख्येत झालेली मागच्या काही वर्षांतील वाढ, त्याच्या तुलनेत रस्ता अरुंद असणे व अनेक वळणे आणि चढ-उतार असणे ही प्रमुख करणे आहेत. यातच अनेकदा वाहनांचे अपघात होतात किंवा वाहने बंदही पडतात. या समस्येमुळे मिरा-भाईंदर, ठाणे व वसई-विरार पट्ट्यातील नागरिकांना मागील अनेक वर्षांपासून त्रस्त सहन करावा लागत आहे.

यातून नागरिकांची कायमची सुटका करण्याच्या दृष्टीने फाऊंटन हॉटेल ते गायमुखपर्यंतचा सुमारे सहा किमीचा ३० मीटर इतका असणारा रस्ता ६० मीटर इतका रुंद करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. त्याकरता हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मिरा-भाईंदर पालिकेला हस्तांतरित करण्यात येणार आहे. तर, रुंदीकरणाचे काम 'एमएमआरडीए'मार्फत केले जाणार आहे. महापालिकाला केवळ विकास आराखड्यात रस्ता रुंद दर्शवण्यासह जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

मिरा-भाईंदरचा नवा विकास आराखडा अंतिम करण्याचे काम राज्य सरकारकडून सुरू आहे. यात घोडबंदर रस्ता रुंदीकरणाचा फेरबदल करण्यासह आराखडा अंतिम मंजूर होण्यास आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे. हा विलंब टाळण्यासाठी महापालिकाकडून त्यांच्या स्तरावर रस्ता विकास आराखड्यात दर्शवण्याची कार्यवाही केली जाणार आहे. महापालिकाला नव्या नियंत्रण नियमावली अंतर्गत आराखड्यात फेरबदलाचे अधिकार प्राप्त झाले आहेत, त्याआधारे जुन्याच विकास आराखड्यात हे फेरबदल केले जाणार आहेत. त्यानुसार, आवश्यक कार्यवाही लवकरच सुरू केली जाणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी दिली.



### खासगी, शासकीय जमिनीचे संपादन

मिरा-भाईंदर महापालिकाला घोडबंदर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर खासगी व शासकीय जमिनींचे संपादन करावे लागणार आहे. ही कार्यवाही विकास आराखड्यात रस्ता रुंद दर्शवल्यानंतरच हाती घेता येणार आहे. त्यानंतरच प्रत्यक्षात 'एमएमआरडीए'ला रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेता येणार असल्याचे महापालिका शहर अभियंता दीपक खांबित यांनी सांगितले.

## तरुणाची आत्महत्या

**भाईंदर :** मिरा रोडमध्ये इमारतीच्या सोळाव्या मजल्यावरून उडी मारून एका ३३ वर्षीय तरुणाने आत्महत्या केली आहे. याप्रकरणी काशिमिरा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

काशिमिरा भागात डीबी ओझोन सोसायटीत सचिन, राहत होता. सोळाव्या मजल्यावरून उडी मारल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला शासकीय जोशी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यापूर्वीच तो मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. नैराश्यामुळे व्यसनाधीन झाल्याने त्याने हे पाऊल उचलल्याचा अंदाज पोलिसांकडून वर्तवला जात आहे.

लोकसत्ता पु.पा.४.

# महामार्गाच्या कामात नियोजनाचा अभाव?

## चिंचोटी-कामण-भिवंडी रस्त्यावर वाहतूक कोंडी

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** चिंचोटी- कामण-भिवंडी या २२ किलोमीटर रस्त्याच्या नूतनीकरण करणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरू केले आहे. मात्र या कामाचे नियोजन योग्य रित्या न केल्याने वाहतूक कोंडी यासह अन्य समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

वसई पूर्वेच्या भागातून चिंचोटी कामण ते भिवंडी असा २२ किलोमीटरचा राज्य महामार्ग गेला आहे. ठाणे भिवंडी यासह अन्य विविध भागांना जोडणारा हा महत्त्वाचा महामार्ग आहे. हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग भिवंडी यांच्या अखत्यारीत येत असून सुरुवातीला या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम सुप्रीम कंपनीकडे सोपविण्यात आले होते. मात्र त्यांनी केवळ टोल वसूल करण्यापलीकडे कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना न केल्याने रस्त्याची दुर्दशा झाल्याचे आरोप होत आहेत. मागील काही वर्षापासून या रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. जागोजागी पडलेले खड्डे, त्यातून करावा लागणारा धोकादायक प्रवास यामुळे येथील नागरिक त्रस्त झाले होते. अनेकांचा या रस्त्यावर अपघात होऊन मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. सातत्याने निर्माण होत असलेल्या अडचणीमुळे नागरिकांनी अनेकदा आंदोलन केली होती.

नागरिकांच्या वाढत्या रोषामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सुरु केले आहे. मात्र या कामाच्या दरम्यान वाहतूक नियोजन, ये-जा करण्याचे पर्यायी मार्ग, सुरक्षा संसाधने, सूचना फलक, वाहतूक नियंत्रण कर्मचारी अशा विविध उपाययोजना आखणे गरजेचे होते. तसे न झाल्याने सातत्याने वाहतूक कोंडी होऊन याचा फटका रिक्षाचालक, विद्यार्थी, मालवाहतूकदार व अन्य नागरिकांना बसू लागला आहे.

एकीकडे कामाची सुरुवात झाली ही गोष्ट समाधानकारक असली तरी दुसरीकडे त्याचे कोणतेच नियोजन केले जात नसल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

### तात्पुरत्या स्वरूपात स्थगिती

**रस्त्याचे काम सुरू करताना नागरिकांना वाहतुकीला अडथळे निर्माण होऊ नये यासाठी स्थानिक प्रशासन व वाहतूक पोलीस यांच्याकडून ना हरकत परवानगी घेतली जाते. मात्र तशा कोणत्याच परवानग्या न घेताच हे काम सुरू आहे. नागरिकांनी याबाबत आंदोलन केले. या आंदोलनानंतर सद्यस्थितीत या कामाचे योग्य नियोजन होईपर्यंत पोलिसांनी काम स्थगित केले आहे.**



### पूरस्थितीची शक्यता

**चिंचोटी-कामण-भिवंडी २२ किलोमीटर पर्यंतच्या रस्त्यावर कॉंक्रीटीकरण करण्यात येत आहे. या कॉंक्रीटीकरणात रस्त्याची उंची ही दोन ते अडीच फुटांनी वाढविली आहे. यामुळे पावसाळ्यात रस्त्याच्या आजूबाजूच्या भागात पाणी साचून पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, असे येथील नागरिकांनी सांगितले आहे. याशिवाय गटार व्यवस्था नसल्यामुळे पाण्याचा निचरा होणार कसा, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

लोकसत्ता ५.५.१९.    लोकमत ५.५.१९    लोकमत ५.५.१९.

## अनाथाश्रमाच्या कार्यपद्धतीवर संशय

**वसई :** आईचा विरह सहन न झाल्याने अनाथाश्रमातील ८ वर्षांच्या मुलाच्या आत्महत्येमुळे आश्रमाच्या कार्यपद्धतीवरही संशय निर्माण झाला आहे. उत्तन सागरी पोलिसांनी या संपूर्ण घटनेची चौकशी सुरू केली आहे.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथे असलेल्या केयरींग हँड्स सेवा कुटीर या अनाथआश्रमात ८ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली आहे. नालासोपाऱ्यात राहणाऱ्या त्याच्या आईने सलमनानला (नाव बदललेले) अनाथाश्रमात ठेवले होते. तो सतत आईला घरी घेऊन चल अशी विनवणी करत होता. सोमवारी रात्री ११ नंतर मुलांची जेवणे झाली आणि मुले झोपायला गेली होती. त्यानंतर सलमान नजर चुकवून बाहेर गेला होता. जवळच्या विहिरीत त्याचा मृतदेह आढळून आला होता.

संस्थेच्या आवारात ही विहीर होती. त्याला संरक्षक जाळी का नव्हती? संस्थेतील मुलांना रात्री एकट्याला कसे बाहेर जाऊ दिले? सीसीटीव्ही का नव्हते? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहे. माझा पुतण्या हा अतिशय घाबरट होता. तो रात्री एकट्याने बाहेर जाऊ शकत नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी मुलाच्या काकाने केली आहे. आश्रमचालक विलास जगताप यांच्याशी वारंवार संपर्क करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करण्यात येत आहे. मृत मुलीच्या आईचा सविस्तर जबाब, संस्थेचे चालक आणि कर्मचारी यांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात येत आहेत असेही कारंडे यांनी सांगितले.

## दुचाकीस्वारास मारहाण




**मीरा रोड :** भाईंदरच्या उतन धावगी रोड येथे राहणारे जावेद जाफर कुरेशी हे बेसिन कॅथॉलिक बँक येथून दुचाकी घेऊन घरी निघाले होते. त्यावेळी एका कारचालकाने कुरेशी यांना कट मारून खाली पाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी कुरेशी याने शिवी देत गाडी कशी चालवतो? असे विचारले असता कार चालकाने खाली उतरून कुरेशी याच्या डोक्यातील हेल्मेट काढत ते त्यांच्या डोक्यावर मारले. तसेच हाताने नाक, छाती, गळ्यावर मारहाण केली. त्यात कुरेशी जखमी होऊन त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. भाईंदर पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## वृद्धाची केली फसवणूक




**नालासोपारा :** विरारच्या धर्मानगर येथील जीवदानी अपार्टमेंटमध्ये राहणारे रमेश भोईर (वय ६९) यांची फसवणूक झाली आहे. २९ ते ३२ वयोगटातील दोन आरोपींनी त्यांना विरार पश्चिम रेल्वे स्टेशनच्या बाहेरील राज वाइन्स शॉपच्या समोरील रस्त्यावर मंगळवारी दुपारी पावणेतीन वाजण्याच्या सुमारास अडवले. तिथे त्यांच्या हाताला रुमाल चोळून त्यांच्याकडील सोन्याची चेन, अंगठी व राडो कंपनीचे घड्याळ असा ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल घेऊन फसवणूक केली आहे. विरार पोलिसांनी बुधवारी गुन्हा दाखल केला आहे.

## कपड्याच्या दुकानात चोरी

**नालासोपारा :** संतोष भवनच्या यमुनाबाई चाळीतील एका कपड्याच्या दुकानात चोरी झाली आहे. चोरट्याने मंगळवारी रात्री बंद असलेल्या ओम मार्ट नावाच्या कपड्याच्या दुकानाचे शटर उचकटून आत प्रवेश केला. दुकानातील लेडिज कुर्ती, टॉप, फ्रॉक, पुरुषांचे विविध कपडे असा ५१ हजारांचा मुद्देमाल त्याने चोरून नेला आहे. दुकान मालक नीलम साहू (३०) यांनी बुधवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## वरसावे खाडीत उडी मारून आत्महत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरारच्या फुलपाडा येथील वेद हाईट्स येथे राहणारे बाळू लोंढे (५१) यांनी वरसावे खाडीत उडी मारून आत्महत्या केली आहे. नायगाव पोलिसांनी बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

कर्ज झाल्याने ते मी फेडू शकत नसल्याने मी आत्महत्या करीत आहे, असा मेसेज व्हॉट्सअॅपद्वारे पत्नीला आणि मुलाला पाठवून त्यांनी मंगळवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास भाईंदर येथील खाडीत उडी मारून आत्महत्या केली आहे. नायगाव पोलिसांनी बुधवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे.

लोकमत पु.पा.१.

# मंत्रालयात नोकरी देतो सांगून केली फसवणूक

## दाम्पत्यास अटक : म्होरक्याचा शोध सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मंत्रालयात नोकरी लावतो सांगून भाईंदरच्या एकास फसवणाऱ्या दाम्पत्यास पोलिसांनी अटक केली असून, गुन्ह्यातील म्होरक्याचा पोलिस शोध घेत आहेत.

मालाड, राजनपाडा, साई सदन चाळ भागात राहणाऱ्या सागर चंद्रकांत कासारे व त्यांची पत्नी प्रीती यांनी भाईंदरच्या मुर्धा गावात राहणाऱ्या निकी भोईर याला मंत्रालयामध्ये नोकरी लावतो सांगितले. त्यासाठी त्यांनी १ ऑगस्ट २०१८ पासून ४ लाख २० हजार रुपये निकीकडून घेतले. नोकरीला लावल्याचे नियुक्ती पत्रदेखील दिले, मात्र ते नियुक्ती पत्र बनावट निघाले. निकी यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिस ठाण्यात सागर आणि प्रीतीविरुद्ध १ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. ५ ऑक्टोबर रोजी सागर याला मालाड येथील राहत्या घराजवळून तर प्रीती हिला मीरा रोडच्या कनकिया भागातून अटक केली.



### पोलिसांच्या ताब्यात

- **अटक केलेल्या सागर व प्रीती यांना भाईंदर पोलिसांच्या हवाली केले आहे. भाईंदर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रशांत शिंदे यांनी तपास चालवला आहे.**
- प्रीती ही एका इव्हेन्ट मॅनेजमेंट आस्थापनेत काम करत असताना तिची ओळख एका व्यक्तीशी झाली होती. त्याने मंत्रालयात नोकरीला लावायचे असेल, तर काम करून देऊ, असे सांगितले होते.
- **त्या अनुषंगाने सागर व प्रीती यांनी त्यांच्या परिचयातील निकीला नोकरीबाबत सांगितले. पोलिस आता या गुन्ह्यातील म्होरक्याचा शोध घेत आहेत.**

लोकमत पु.पा.३.

# रस्ता ओलांडताना तरुणाचा मृत्यू

**नालासोपारा :** पेल्हार गावातील सुपरस्टार मार्बल दुकानात काम करणारे बिरबल पासवान (वय ४२) यांचा रस्ता ओलांडताना अपघातात मृत्यू झाला आहे. ते ७ ऑक्टोबरला संध्याकाळी मुंबई-गुजरात महामार्गावरील इलाफ ढाब्याच्या समोरून रस्ता ओलांडून घरी येत होते. यावेळी भरधाव वाहनाने त्यांना ठोकर मारली. यात त्यांचा मृत्यू झाला. वाहनचालक पळून गेल्याने पेल्हार पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# दुचाकीची ठोकर; एकाचा मृत्यू

**नालासोपारा :** विरारच्या डोंगरपाडा येथील पखाराई येथे राहणारे केशव पाटील (६४) यांना दुचाकीने ठोकर मारल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास डोंगरपाडा येथील आत्माराम पार्क येथे भरधाव वेगातील दुचाकीने केशव यांना ठोकर मारून दुचाकीचालक पळून गेला. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे. विरार पोलिसांनी आरोपी दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु.पा.३

# चार जिल्ह्यांतून तडीपार; आदेशाचे केले उल्लंघन

## तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी तुळींज येथे एका आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




संतोष भवनच्या शुक्ला नगर येथील श्री साई कृपा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या इस्लाम शेख (४४) याला पोलिस उपायुक्त परिमंडळ दोन यांनी १२ जुलै २०२४ पासून १ वर्षाकरिता पालघर, ठाणे, नाशिक, मुंबई उपनगर कार्यक्षेत्रातून तडीपार आदेश काढले होते. मात्र, त्यानंतरही आरोपी सोमवारी रात्री साडे आठच्या सुमारास घरीच दिसून आला. याप्रकरणी आरोपीविरोधात मंगळवारी पोलिस अंमलदार दशरथ वाहूळे (३७) यांनी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पान नं. २.

# गणेशोत्सवानंतरही रस्ते पुन्हा खड्डेमय

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेने गणेश-उत्सवापूर्वी शहरातील खड्डेमय रस्त्यांची डागडुजी केली. या गणेशोत्सवानंतर रस्ते पुन्हा खड्डेमय झाल्याने हे खड्डे तत्काळ दुरुस्त करण्यात यावे, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने गुरुवारी आयुक्त संजय काटकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली.

यावेळी, शहरातील खड्डे बुजविण्यात अपयशी ठरलेल्या प्रशासनाविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. शहरात अनेक दिवसांपासून जागोजागी काँक्रिट रस्त्यांच्या नावाखाली पालिकेने सुस्थितीतील रस्ते खोदले आहेत. यावेळी शहरातील लोकांना पावसाळ्याचे कारण प्रशासनाकडून देण्यात आल्याने अनेक दिवस लोकांना खड्डेयुक्त रस्त्यातून प्रवास करावा लागला. खोदलेल्या रस्त्यांमुळे पावसात अनेक ठिकाणी पाणी साठल्याने लोकांना त्यातून पायपीट करताना नाहक त्रास सहन

लोकमत पु.पा.५.


# शस्त्र परवाना काढताय; पण, हवाय कशासाठी?

## पोलिस आयुक्तालयात गतवर्षीपेक्षा यंदा संख्या कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** स्वतःचे रक्षण करण्याच्या उद्देशाने पूर्वी शस्त्र जवळ बाळगण्याचा परवाना काढला जायचा. गेल्या काही वर्षांत मात्र स्वरक्षणासाठी नव्हे; तर फॅशन म्हणून पिस्तूल जवळ बाळगणाऱ्यांची संख्या वाढायला लागली आहे. पोलिस आयुक्तालयात गतवर्षीच्या तुलनेत शस्त्र परवान्यांची संख्या मात्र कमी झालेली आहे.

दरवर्षी या शस्त्र परवान्याचे नूतनीकरण होत असले तरीदेखील संबंधित व्यक्तीला शस्त्र परवान्याची गरज आहे का, कोणत्या कारणासाठी परवाना घेतला आहे याची सर्व माहिती घेतली जाते. तसेच शस्त्र परवानाधारकांची पडताळणी संबंधित पोलिसांमार्फत शस्त्र नूतनीकरणप्रसंगी वेळीवेळी होत असते.




### शस्त्र परवाना कोणाला दिला जातो?

आत्मसंरक्षण या कारणासाठी प्रामुख्याने शस्त्र परवाना दिला जातो. परवाना देण्यात आला म्हणून शस्त्राचा गैरवापर करुन गुन्हा केल्यास माफी मिळत नाही. त्यामुळे परवानाधारक व्यक्तींनी कायद्याचे पालन करुन शस्त्राचा वापर योग्य ठिकाणीच करणे आवश्यक आहे. विविध स्वरुपातील अटींची पूर्तता करणाऱ्या व्यक्तीलाच परवाना दिला जातो.

### कागदपत्रे कोणती आवश्यक?

शस्त्र परवान्यासाठी ओळखीचा आणि पत्त्याचा पुरावा लागतो. पासपोर्ट साइज फोटो, मतदान ओळखपत्र, मागच्या तीन वर्षांतील इन्कम टॅक्स रिटर्नची माहिती द्यावी लागते. आपल्या भागातील दोन चांगल्या व्यक्तीकडून चारित्र्य प्रमाणपत्र, फिटनेस, शैक्षणिक प्रमाणपत्रे, जन्म प्रमाणपत्र आवश्यक असतात.

### किती गोळ्यांची परवानगी?

शस्त्रपरवाना प्रवर्गनिहाय काडतुसांची संख्या मंजूर करण्यात येते. स्वसंरक्षणसाठी १०० ते २०० गोळ्या, शेती संरक्षणसाठी ५०-१०० गोळ्या, स्पोर्टससाठी विविध प्रवर्गानुसार काडतुसे मंजूर करण्यात येतात.

### शस्त्र परवान्याचे प्रकार किती?

स्वसंरक्षण, शेती, स्पोर्टस, प्रदर्शन

### काळजी घेणे आवश्यक

परवाना असला तरी सार्वजनिक ठिकाणी शस्त्र उघडपणे दिसू नये, शस्त्रामुळे गंभीर स्वरुपातील गुन्हा घडू नये, आदीबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचे पालन न झाल्यास पोलिसांकडून धडक कारवाई होऊ शकते.

सर्व प्रकारच्या अटी आणि शर्तींची पूर्तता करणाऱ्या व्यक्तीस नियमानुसार शस्त्र परवाना दिला जातो. ज्यांना परवाने देण्यात आले आहेत, अशा लोकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली जाते. **- पोलिस प्रशासन**

# ऑनलाइन गंडा; ८ लाख मिळाले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारे तक्रारदार दळवी यांना टेलिग्राम चॅनलवर इन्व्हेस्टमेंट ॲपमध्ये गुंतवणूक करून नफा मिळत असल्याबाबतची जाहिरात दिसली. दळवी यांनी त्यात ३५ लाख ५५ हजार गुंतवले. परंतु, दळवी यांना परतावा तसेच गुंतवलेली मुद्दल परत मिळाली नाही म्हणून त्यांनी सायबर पोलिस ठाणे येथे ५ ऑगस्ट रोजी तक्रार केली.

पो.निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि.स्वप्नील वाव्हळ, उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकरसह स्नेहल पुणे, ओंकार डोंगरे, कुणाल सावळे, शुभम कांबळे यांच्या पथकाने तपास करत वेगवेगळ्या खात्यात वर्ग झालेली रक्कम,खाते गोठविण्याबाबत बँकांना पत्र व्यवहार केले. त्यातील ८ लाख ३० हजार गोठवले. न्यायालयाच्या निर्देशानंतर ती रक्कम दळवी यांच्या मूळ खात्यात परत केली गेली.

# महिलेचे अपहरण; ५० हजारांची उकळली खंडणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड भागात राहणाऱ्या एका विवाहितेचे अनोळखी व्यक्तीने ८ ऑक्टोबरच्या रात्री शांती पार्क भागातून अपहरण केले.


अपहरण केल्यानंतर अनोळखी व्यक्तीने महिलेच्या पतीकडे ५० हजार रुपयांची खंडणी मागितली अन्यथा तिला जीवे ठार मारेन अशी धमकी दिली. त्यामुळे पतीने पन्नास हजार रुपये खंडणी दिली. पतीच्या फिर्यादीनंतर मीरा रोड पोलिसांनी ९ ऑक्टोबरला गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करत आहेत.

दैनिक भास्कर पा.नं.३.

# अवैध निर्माण का खेला

■ मीरा-भायंदर मनपा के एक आयुक्त ने तोड़ा, दूसरे के कार्यकाल में बन रहे

**अनिल चौहान** | भायंदर






अवैध निर्माण जोड़ने और तोड़ने का खेल मीरा-भायंदर में पुराना है। एक आयुक्त तोड़क कार्रवाई करता है, तो दूसरे के कार्यकाल में उसे बनाया जा रहा है। सिल्वर पार्क सिग्नल पर 12 साल पहले तोड़ी गई इमारत बनाने का काम हरे परदे के पीछे चल रहा है। अब यह अवैध निर्माण का जंक्शन बन गया है। मौजूदा समय में यहां तीन अवैध निर्माण चल रहे हैं। इसमें से दो का निर्माण पूरी तरह सर्विस रोड पर हो रहा है। खास बात है कि दो इमारत में बार-लॉज थे। 12 साल पहले तत्कालीन मनपा आयुक्त विक्रम कुमार ने तोड़ दिया था। अब संजय काटकर के समय में बनाए जा रहे हैं। दोनों ही आईएएस हैं, लेकिन दोनों के काम एकदम विपरित नजर आ रहे हैं।

भायंदर-काशीमीरा रोड पर सिल्वर पार्क सिग्नल की सड़क से एकदम सटी चार मंजिली इमारत सर्विस रोड पर बनाई गई थी। इमारत की तल मंजिल पर दुकानें अवैध ढंग से शुरू थीं। अब विधानसभा चुनाव से ठीक पहले हरे पर्दे के पीछे टूटे हिस्से को जोड़ने का काम चालू है। इसके ठीक बगल में भी एक कमर्शियल इमारत का निर्माण पहले से चल रहा है। शुरू से ही इसके खिलाफ शिकायतें और खबरें आती रही हैं। राज्य मानवाधिकार आयोग ने नोटिस जारी कर पुलिस और मनपा आयुक्त से रिपोर्ट तलब किया था। अदालत से स्टे मिला और हटा भी। मीरा-भायंदर महानगरपालिका ने एमआरटीपी एक्ट के तहत एफआईआर भी दर्ज कराई, लेकिन तोड़ने का काम नहीं किया, जबकि विधायक गीता जैन ने स्वयं इसकी शिकायत आयुक्त संजय श्रीपतराव काटकर से की थी। सूत्रों के मुताबिक, इसके ठीक बाजू में एक और कमर्शियल गाला बनकर तैयार हो गया है। सरकार में शामिल एक पार्टी के स्थानीय नेता का भाई इसे बनवाने की सुपारी ली थी।

**अवैध निर्माण दोबारा बन जाते हैं: सुवर्णा:** पूर्व नगरसेवक रोहित सुवर्णा ने कहा कि अवैध निर्माण रोकने की मंशा ही मनपा प्रशासन की नहीं है। अवैध निर्माण निजी लाभ का जरिया बना हुआ है। प्रशासन जिस अवैध निर्माण को तोड़ता है, उसे फिर बनवा देता है। मुख्यमंत्री एकनाथ शिंदे के आदेश पर भी कई बार-लॉज के आधे और पूरे अवैध हिस्से तोड़े गए थे। उनमें से कई का निर्माण फिर चालू है। 99.99% अवैध निर्माण दोबारा बन गए हैं।

> कानूनी प्रक्रिया पूरी कर अवैध निर्माण तोड़े जाएंगे, इसमें थोड़ा समय लगेगा।
> **- डॉ. संभाजी पानपट्टे,** अतिरिक्त आयुक्त, मीरा-भायंदर मनपा

# ओडिशा से दुराचार का आरोपी हुआ गिरफ्तार


■ विवाह का दिया था झांसा

**भास्कर संवाददाता** | विरार

नालासोपारा की पेल्हार पुलिस ने दुराचार के आरोप में एक आरोपी को ओडिशा से गिरफ्तार किया है। आरोपी ने नालासोपारा में रहनेवाली एक युवती से विवाह का वादा कर दुराचार की वारदात को अंजाम दिया था। आरोपी पहले से शादीशुदा है। आरोपी की पहचान सुबान अंसारी के रूप में हुई है। पुलिस ने बताया कि नालासोपारा में 20 वर्षीय युवती परिवार के साथ रहती है। आरोपी भी इस क्षेत्र का निवासी है। कुछ साल पहले दोनों की पहचान हुई थी। आरोपी ने पीड़िता को बताया कि वह यहां अकेला रहता है और उसका विवाह नहीं हुआ है। उसने पीड़िता से विवाह करने का प्रस्ताव रखा। इसके बाद आरोपी ने पिछले महीने 15 सितंबर से एक दिसंबर के बीच विवाद और प्यार वास्ता देकर अलग-अलग जगह पर दुराचार की वारदात को अंजाम दिया। हालांकि कुछ समय बाद पीड़िता ने आरोपी को फोन पर पत्नी के साथ बात करते हुए पकड़ लिया। परिजन के कहने पर पीड़िता ने पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई। मामला दर्ज होते ही आरोपी फरार हो गया था। डिटेक्शन ब्रांच की टीम लोकेशन के आधार पर ओडिशा गई। मिराकापुर पुलिस स्टेशन के अंतर्गत रहनेवाले आरोपी को गिरफ्तार कर लिया गया।

# ट्रैफिक पुलिस की कार्रवाई से नाराज युवक ने बाइक में आग लगाई

**भास्कर संवाददाता** | वसई



ट्रैफिक पुलिस द्वारा पकड़े जाने से नाराज एक युवक ने बीच सड़क पर अपनी बाइक में आग लगा दी। असल में बाइक चालक शिवकुमार नायर शराब के नशे में था और वसई (पश्चिम) सनसिटी क्षेत्र में तेज रफ्तार से बाइक चला रहा था। फिलहाल पुलिस ने बाइक चालक को हिरासत में लिया है। यातायात विभाग के पुलिस निरीक्षक महेश शेटये ने बताया कि गुरुवार दोपहर करीब तीन बजे वसई ट्रैफिक पुलिस सनसिटी क्षेत्र में चेकिंग कर रही थी। इसी दौरान बाइक से आ रहे शिवकुमार को रोका गया। पुलिस की जांच में पाया गया कि उसने जरूरत से ज्यादा शराब पी रखी है। पुलिस ने उसकी बाइक जब्त कर ली और नोटिस देकर दूसरे दिन पुलिस स्टेशन बुलाया। हालांकि शिवकुमार शाम पांच बजे ही ट्रैफिक पुलिस के पास पहुंचा और हुडदंग मचाने लगा। इस दौरान कार्रवाई से नाराज शिवकुमार ने गुस्से में बाइक को लात मारी और उसमें आग लगा दी। बीच सड़क पर बाइक धू-धू कर जल उठी। कुछ देर के लिए अफरातफरी सा माहौल हो गया था।

# Abattoir funds diverted to memorial

Suresh Golani
MIRA BHAYANDAR

Less than 24 hours after the Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC), rolled back the tender, which was floated inviting bids for the construction of a slaughter-house in Uttan, the state government diverted funds amounting Rs50 crore for the upcoming art gallery in memory of Shiv Sena founder, late Balasaheb Thackeray.

As per the corrigendum issued by the urban development department on October 7, the funds meant for the slaughterhouse will now be pumped for the world class art gallery, which is coming up on a vast 1.80 lakh sq ft plot tagged with a reservation of social forestation in Bhayandar.

**MBMC scrapped tender for slaughter house, proposed on the virtue of funds amounting to ₹50 crore**

Notably, former BJP legislator Narendra Mehta had threatened to end his life by jumping off the main administration building of the civic body if the slaughter house project was not scrapped. Fearing law and order problems, the public works department took the decision three days after the tender was floated on October 3, inviting bids for the construction of the slaughter house.

As per section 63 (12) of the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 reasonable and adequate provision has to be made by corporations for the construction or acquisition and maintenance of public markets and slaughter-houses and the regulation of all markets and slaughter-houses.

In an apparent bid to avoid constraints before the likely imposition of the model code of conduct for the upcoming assembly elections, the state government hurriedly diverted the funds.

Designed to showcase the era of the life and times of Thackeray with a blend of modern age technology, the structure will house special galleries, which will not only display articles and books associated with the life of Thackeray but also exhibit collection of his select political/ social cartoons, rare photographs, editorials and digitised versions of famous speeches in different languages, using multimedia audio technology.

# 2 Gujaratis held with 45 swords in Kashimira

Suresh Golani
MIRA BHAYANDAR

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police arrested two blacksmiths (metal workers) with 45 swords worth Rs45,000 in Kashimira on Tuesday. Acting on a tip-off, a team attached to the crime detection unit of the Kashigaon police intensified patrolling and noticed two suspicious-looking men sitting in an open adjacent to Hotel Pali Village on the highway in Kashimira at around 3pm. After spotting the police jeep, both of them tried fleeing the place but were caught by the police personnel after a hot chase.

**Police officials are now trying to ascertain the source of the swords and their potential buyers**

The accused Tedabhai Ratanbhai Lohar, 27, and Rohitkumar Rajkumar Loha, 25, are residents of Kalol city in Gandhinagar district of Gujarat. The duo who work as blacksmiths in Kamrej area of Surat were found to be in possession of two nylon bags containing the swords stamped with "Sirohi ki Prasidh Talwar, 30 Saal ki Guarantee" (Sirohi's famous sword, 30 years guarantee).

Apart from conducting a background check, the police team are also trying to ascertain the source of the swords and their potential buyers.